## नियमित दिवाणी दावा क्रमांक १४७/२०२३ मधील नि.क्र.११ वरील आदेश
## (पोपट डोंबाळे वि. खंडू कृष्णा डोंबाळे वगैरे)

१. वादी यांनी सदरचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केला आहे.

२. वादीचे असे कथन आहे की, प्रस्तुत दावा वाटपाचा आहे. सदर दाव्यातील वंशावळीत वादीचे आजोबा कृष्णा यांचे मृत्यूची तारीख नमूद नाही. त्याप्रमाणे त्यांनी वंशावळीत ''कृष्णा'' या नावापुढे (मयत दिनांक २२/०२/२०००) असे नमूद करावे तसचे नि.क्र.१ कलम ३ मध्ये स्वतंत्र परिच्छेद करुन त्यात,''वादीचा जन्म दि.०१/०१/१९६४ रोजी झाला. वादीचे आजोबा कृष्णा दि.२२/०२/२००० रोजी मयत झाले. तसेच वादीचे वय ५५ यास कंस करुन त्यापुढे ''कमी केले'' व पुढे ''६०'' असे नमूद करावे. वादीचे पुढे असे कथन आहे की दाव्याचा वादप्रश्न सोडवणेस, दाव्याच्या परिणामकारक परिपूर्ण, अंतिम न्यायनिवाडयासाठी सदरची दुरूस्ती आवश्यक आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करण्याची विनंती केली.

३. प्रतिवादी यांनी अर्जाच्या पाठीमागे त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जातील कथने मान्य व कबूल असल्याचे कथन केलेले आहे. तसेच अर्ज मंजूर होणेस हरकत नसलयाचे कथन करून योग्य तो आदेश व्हावा अशी विनंती केलेली आहे. तसेच त्यांनी पुढे असे कथन केले आहे की वादीने अर्जाच्या पृष्ठयर्थ कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही.

४. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. वादीने प्रस्तुतचा दावा सरस निरस मानाने वाटप होवून पृथक कब्जा मिळणेसाठी दाखल केलेला आहे. दाव्यात नमूद मिळकती या वादी व प्रतिवादी यांचे वाडवडिलार्जित मालकी व कब्जेवहिवाटीच्या मिळकती आहेत. वादीने मागितलेली दुरुस्ती ही वंशावळीत वादीचे आजोबा कृष्णा यांच्या मृत्यूची तारीख नमूद करण्याबाबत तसेच वादीच्या जन्मतारीख व वयासंबंधी स्पष्टता आणण्यापुरती मर्यादित आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याचा मूळ स्वरूप अथवा दाव्याचे कारण बदलत नाही. तसेच ही दुरुस्ती दाव्याच्या परिणामकारक, परिपूर्ण व अंतिम न्यायनिवाड्यासाठी आवश्यक असल्याचे दिसून येते. प्रतिवादी यांनी अर्जातील कथने मान्य व कबूल असल्याचे स्पष्टपणे नमूद केले असून, अर्ज मंजूर होण्यास हरकत नसल्याचेही सांगितले आहे. जरी प्रतिवादी यांनी वादीने कागदोपत्री पुरावा सादर केलेला नाही असे नमूद केले असले, तरी प्रस्तावित दुरुस्ती ही केवळ तथ्यात्मक स्पष्टतेसाठी असून, तिचा निर्णय दाव्याच्या अंतिम सुनावणीवेळी पुराव्याच्या आधारे घेता येईल. सदर दुरुस्ती मंजूर केल्यास प्रतिवादींना कोणतेही नुकसान होणार नाही. उलटपक्षी, दुरुस्ती नामंजूर केल्यास वादातील कायद्याच्या दृष्टीने आवश्यक असलेली तथ्ये अपूर्ण राहून भविष्यात तांत्रिक अडचणी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने वादीने मागितलेली दुरुस्ती करण्याची परवानगी देणे योग्य व आवश्यक आहे. या सर्व बाबींचा विचार करता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. वादीचा नि.क्र.११ चा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादी यांनी निशाणी क्र.११ मध्ये केलेल्या मागणी प्रमाणे निशाणी क्र.१ मध्ये दुरूस्ती करण्याची परवानगी देण्यात येते.

३. वादी यांनी पुढील तारखेस दुरूस्ती करुन दाव्याची प्रत दाखल करावी.

४. खर्चाबाबत कोणताही आदेश नाही.

RAHUL BHALCHANDRA KULKARNI

Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2026.01.22 18:18:12 +0530

आटपाडी. **( आर.बी.कुलकर्णी )**

दिनांक २२/०१/२०२६. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.,

आटपाडी.

**Certificate**

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - A. S. Yadav
Court - Jt. CJJD and JMFC, Atpadi.
Date - 22.01.2026
Order signed by the
Presiding Officer on - 22.01.2026
Order uploaded on - 22.01.2026